महा मेट्रो

PUNE METRO

## महामेट्रोचा पर्यावरणपूरक पुणेमेट्रो रेल्वे प्रकल्प

महामेट्रो रेल पुणे प्रकल्प हा पर्यावरणपूरक असून त्यामध्ये जास्तीत जास्त वृक्षांचे पुनर्रोपण तसेच याशिवाय शहरांच्या हरित सौंदर्यागीकरण करणासाठी मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड व संवर्धनाची योजना राबविणाचे काम हाती घेण्यात आले . याच उपक्रमा अंतर्गत सन २०१७ च्या पावसाळी हंगामा मध्ये तळजाई वनविभाग येथे वृक्षांची लागवड करता यशस्वी रित्या संवर्धनाचे काम चालू आहे . या वृक्षलागवडीमध्ये प्रामुख्याने स्थानिक प्रजातींच्या निवड केली आहे त्यामध्ये आंबा , जांभूळ , बोर , चिंच, आवळा , आकाश निल , कडुलिंब , विलायती , चिंच , भोकर , कांचन , पिंपळ , वड, पुत्र जिवा, करंज ,वाळवा , उंडीन यांचा समावेश आहे . या वर्षीचे उद्दिष्ट्य १००० वृक्ष लागवडीचे असून आज अखेर ४५० वृक्षांची लागवड झाली असून उर्वरित काम चालू असल्याचे आढळून आले.

प्रत्यक्ष भेटीमध्ये ३००० वृक्षांच्या देखभालीचे काम समाधान कारक करीत असल्याचे निदर्शनास आले आहे . याचा चांगला परिणाम शहराच्या पर्यावरण संवर्धनावर होण्यास मदत होणार आहे .